स. फौजदारी खटला क्र. **१०५३/२०२३**
सरकार विरूद्ध राजकुमार व अन्य एक
**निशाणी ३६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : दादाराव अर्जुण आग्रे,
वय : ६० वर्षे,
धंदा : शेती काम,
राहणार : वारूळा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी आरोपी राजकुमार वानखडे व कविता वानखडे यांना ओळखतो. गावचे असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. दोन्ही आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहेत. मी फिर्यादी विनोद वानखडे यांना देखील ओळखतो. घटना केव्हा, कुठे व काय घडली हे मला काहीच माहित नाही. घटनेवेळी मी घरी होतो. असे घडले नाही की, माझे समक्ष आरोपींनी फिर्यादीला मारहाण केली.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/०८/२०२३ रोजी मला भांडणाचा आवाज आल्यामुळे मी बाहेर आलो असता मी पाहिले की, आरोपी क्र. १ याने फिर्यादीला दगड फेकुन मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादीला

डोक्यावर, मांडीवर व उजव्या पायाच्या टोंगळ्यावर दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला पाहुन घेता अशी धमकी देउन शिवीगाळ केली. आता मला माझे बयानातील अधारेखांकित भाग 'अ' वाचुन दाखवला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानात नमुद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जे. सांगोळे यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २२.१२.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.